## कास पठाराच्या संरक्षणासाठी एक लोकसंवाद..

*पश्चिम घाटातील पठारांच्या मालिकेत कासचे नाव सर्वश्रुत आहे ते रानफुलांच्या सौंदर्यासाठी. पर्यटनाचा वाढता दबाव लक्षात घेता कास पठाराच्या संरक्षणासाठी विचारपूर्वक आणि नियोजनबद्ध उपाय अमलात आणणे जरूरीचे आहे.*

*याच हेतूने किरण पुरंदरे आणि अनुज खरे यांनी शनिवारी ७ जुलै २०१२ पुण्यात इंद्रधनुष्य सिटीझनशिप एन्व्हायर्नमेंट एजुकेशन सेंटर येथे एका लोक संवादाचे आयोजन केले होते. महाराष्ट्र शासन वन विभागाच्या अनेक मान्यवर अधिकाऱ्यांसमवेत कास पठारावर काम करणाऱ्या संशोधक व पर्यावरण संस्थानी ही यात सहभाग घेतला. याच लोकसंवादात पुढे आलेल्या महत्त्वाच्या मुद्द्यांचे समालोचन...*

नुकतीच युनेस्कोच्या जागतिक वारसा क्षेत्र यादीत पश्चिम घाटातील ३९ ठिकाणे जैववारसा क्षेत्र म्हणून समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यातीलच कासचे पठार हे जैवविविधतेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठिकाण आहे. गेल्या काही पावसाळ्यांत या पठारावरील रानफुलांचे वैभव पाहण्यासाठी येणारी गर्दी अन बेजबाबदार पर्यटन लक्षात घेता या जैवविविधता क्षेत्राचे वेळीच नियोजनपूर्वक जतन करावे लागेल.

यासाठी मुळात कासचे पठार इतके विशेष का आहे हे समजून घ्यावे लागेल. पश्चिम घाटात काससारख्या पठारांची एक मालिकाच आहे. ज्यांना स्थानिक भाषेत *"सडे"* असे संबोधन प्रचलित आहे. याच सड्यांच्या (rock outcrops) तज्ञ, डॉ. अपर्णा वाटवे यांनी कासचे पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्व विषद केले.

उघडे पडलेले खडक व अतिशय कमी मृदावरण हे सड्यांचे सामान्य भौगोलिक स्वरूप असते. ज्यामुळे येथील हवामानात अतिशय टोकाच्या विषमता दिसून येतात. सड्यांच्या खास भौगोलिक संरचनेला व हवामानाला लक्षात घेता येथील जैवविविधता देखील स्वाभाविकपणे विशेष आहे.

वनस्पती, गवते, कीटक, सरपटणारे प्राणी यांसह अनेक दुर्मिळ जैवगटांचे अस्तित्त्व या पठारावर शतकांपासून विकासित होत आले आहे. या जाती केवळ अशा परिसंस्थेतच जगू शकतात. विविध जातींचे शैवाल (algae), नेचे(ferns), कवके(Fungi) तसेच अनेक छोट्या वनस्पती (herbs and shrubs) येथील विषम परिस्थितीशी जुळवून घेत वाढतात. त्यातील फुलांचे परागीभवन करणारे कीटक, फुलपाखरे, पावसाळी डबक्यातले मासे, बेडूक, खेकडे तसेच कपारीत आसरा घेणारे सरडे व साप इत्यादी प्राणी येथील रहिवासी आहेत.

*पावसाच्या तीन महिन्यात उगवून बहरून आपल्या बिया मातीत सोडून पाण्याचे दुर्भिक्ष्य येण्यापूर्वीच आपली जीवनचक्र संपवणारी विविधरंगी गवतफुले वगळता देखील या पठारावर खूप काही उगवते....*

*कासच्या पठाराची अशी पुरातन परिसंस्था अतिशय पक्व तसेच एका स्थिर उत्क्रांतीच्या पर्वात steady course of evolution आहे . इतक्या नाजूक परस्परावलंबित्वाने interdependence हिचा तोल साधला आहे कि मानवी हस्तक्षेपाने यातील एक दुवा जरी नकळत तोडला गेला तर कासच्या पठाराचे भविष्य पाचगणीच्या पठारासारखेच उजाड .होताना पहावे लागेल...*

*Aponogeton satarensis* सारख्या हंगामी जलीय वनस्पती केवळ या सड्यांवर, पावसाळी तळ्यामधून सापडतात. या वनस्पतीला IUCNने रेड लिस्टमध्ये समाविष्ट केले आहे.

येथील जैवविविधतेचे अनेक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदे आसपासच्या शेता-वाड्यांना होत असतात. आसपासच्या गावांची पाण्याची गरज हा सडा पावसाचे पाणी साठवून साठवून भागवत असतो.

अनेकविध मार्गांनी होत असलेल्या मानवी हस्तक्षेपामुळे या सड्याचे वैभव कसे नष्ट होत आहे हे सचिन पुणेकर यांनी छायाचित्रांसमवेत स्पष्ट केले. अनियोजित पर्यटन हा कास पठाराच्या ऱ्हासामागचा प्रमुख ताण आहे. हवेचे, पाण्याचे प्रदूषण, अनिर्बंध वाहतूक, कचरा पसरणे या दिसणाऱ्या नुकसानाशिवाय गर्दीच्या पायाखाली तुडवली जाऊन कित्येक नाजूक वनस्पती जीव टाकत आहेत. सततच्या पायदळीने पठारावरील माती घट्ट होत जाऊन तीतून काही उगवणेच कमी होत जाईल. रस्ता पार करणारे अनेक छोटे मोठे प्राणी भरधाव जाणाऱ्या गाड्यांखाली सापडून दरवर्षी जीव गमावतात. निष्काळजीपणे टाकलेल्या चुइंगगमच्या गोड वासाने कीटक आकर्षित होतात अन चिकट्यात पाय गुंतून मृत्युमुखी पडतात. रानफुलांच्या परागीभवनासाठी अत्यंत जरूरी असलेला हा कीटकांचा दुवा मूकपणे तुटत आहे. माणसाच्या हलगर्जीपणामुळे होणारे हे नुकसान वेळीच थांबवले पाहिजे.

गाड्यांचा वाहतुकीसोबत अनेक परदेशी तणांचा प्रसार होतो. रानमारी, बेशरम सारखी स्थानिक प्रजातीना नामशेष करणारी झाडे कास पठारावर पोहोचल्यास हा मोसमी रानफुलांचा उत्सव पुन्हा पहायला मिळणार नाही. पर्यटकांच्या पाठोपाठ त्यांच्यासाठी कणीसवाले, पॉपकोर्नवाले, टपरीवाले इत्यादी येतात. मोठ्या आवाजातली गाणी वाजू लागतात... प्लास्टिक, काचा, बाटल्या इत्यादी कचरा पसरतो.... पठारावरील पाण्याचे स्रोत खराब होतात.

वाढते व्यावसायिक चलनवलन पहाता लवकरच कास पठारावर पवनचक्की प्रकल्प, हॉटेल्स, विश्रामगृहे सुरू करण्यास दबाव येत जाईल. कास पठाराभोवती पाच गावे वसलेली आहेत. या गावातील वाढत्या लोकसंख्येचा ताण देखील पठाराच्या परिसंस्थेवर होत आहे. तेथील गुरांची वाढती संख्या आणि अनिर्बंध चराईमुळे होणारे परिणाम लक्षात घेतले पाहिजेत.

येत्या पावसाळ्यात कासला येणारी पर्यटकांची गर्दी नियंत्रणात ठेवण्यासाठी जून महिन्यात वन विभागाने रस्त्याच्या कडेने कुंपण घातले. या कुंपणासाठी आणलेल्या वाळूचे ढिगारे रस्त्याकडेने टाकले गेले. नदीतून

उपसलेली ही वाळू आजूबाजूच्या अनेक तणांचे बीज घेऊन येते. बाहेरच्या तणांचा असा प्रसार कास पठाराच्या जैवविविधतेला मोठी हानी पोहोचवू शकतो.

कुंपणाच्या खांबांचे रंगकाम रासायनिक रंगात करण्यात आले. हे रंग वापरून झाल्यावर मजुरांनी आसपासच्या डबक्यात हात धुतले. काससारख्या नाजूक परिसंस्थेत अशा प्रकारच्या रसायनांचा प्रवेश झाल्यास किती लहानमोठे दुष्परिणाम होतील हे वेळीच लक्षात घेतले पाहिजे.

यानंतर मुख्य वन संरक्षक, श्री मुंडे यांनी वन विभागाचे म्हणणे लोकांसमोर मांडले. कास पठाराचा ३६०० हेक्टरचा विस्तृत पसारा लक्षात घेता त्यातील १८१४ हेक्टरचे संरक्षित वन राखणे हे वनविभागापुढे एक आव्हानच आहे. संरक्षित वनाच्या कडेने असलेली शेती, गावे अन्य मानवी हस्तक्षेप लक्षात घेता वनविभागाचे मनुष्यबळ कासच्या राखणीसाठी अपुरे आहे. पर्यटनाचा वाढता दबाव नियंत्रणात ठेवण्यासाठी रस्त्यालगत कुंपण घालणे केवळ अपरिहार्य असल्याने करण्यात आले आहे. मात्र इथून पुढे कासच्या संरक्षणासाठी कुठलेही निर्णय घेण्यापूर्वी तज्ञ समितीचा सल्ला घेण्याची तयारी वनविभागाच्या वतीने श्री मुंडे यांनी दाखवली. या समितीमध्ये कास पठार परिसंस्थेवर काम केलेल्या संशोधक, पर्यावरण तज्ञ तसेच स्थानिक पर्यावरण प्रतिनिधींचा समावेश करण्यात येत आहे.

सानिया किर्लोस्कर यांनी लोकांकडून मागवलेल्या प्रतिक्रिया प्रस्तुत केल्या. वाढत्या पर्यटनाच्या व्यवस्थापनाविषयी अनेक लहान मोठे उपाय यात सुचवले आहेत. त्यातील महत्त्वाचे प्रस्ताव पुढील धोरणाच्या नियोजनात घेण्याचे ठरले.

मानसी करंदीकर यांनी कासच्या संरक्षणाचे नियोजन कसे असावे याविषयी भाष्य केले. रानफुले ही कासच्या नैसर्गिक चक्राचा एक भाग आहे. या निसर्गचक्राला आपण प्रस्थापित सौंदर्यदृष्टी बाजूला ठेवून समजून घेतले पाहिजे. मगच आपल्याला केवळ रानफुले बघायला मिळावीत एवढाच संकुचित हेतू न ठेवता कास पठाराचा एक संपूर्ण परिसंस्था म्हणून विचार करता येईल.

इथे काम करणाऱ्या सर्व शासकीय, अशासकीय व संशोधन विषयक काम करणाऱ्या संस्था तसेच व्यक्तीनी परस्पर सहकार्याने नियोजनात भाग घेणे गरजेचे आहे.

जागतिक जैववारसा क्षेत्र दर्जाचा उपयोग करून कास पठाराला कायदेशीर संरक्षण मिळवले पाहिजे. काही उपाययोजना तातडीने करतानाच एक दीर्घकालीन संरक्षण धोरणाचा आराखडा बनवला पाहिजे. या नियोजनात वनविभाग, अन्य शासकीय प्रतिनिधी, संशोधक, पर्यावरण संस्था तसेच नागरिकांचा सहभाग असावा, एकवाक्यता असावी. या धोरणामध्ये कासवरील लहान मोठ्या आसऱ्याचा, स्थानिक लोकांचा, त्यांच्या उपजीविकेचा, पर्यटन सुविधा तसेच जनजागृतीसाठी आस्थेने विचार व्हावा.

कास परिसंस्थेच्या प्रत्येक लहान मोठ्या घटकांचा, विविध जातीच्या वनस्पती तसेच प्राण्यांचा, त्यांमधील परस्पर संबंधाचा बारकाईने अभ्यास झाला पाहिजे. या प्रकारे होणाऱ्या संशोधनाची विस्तृत टिपणे पर्यावरण नियोजनासाठी संकलित झाली पाहिजे.

कासचा भू-वापर अशा प्रकारे नियोजित केला जावा कि ९५% जमीन संरक्षणाखाली यावी. उर्वरित ५% जमिनीवर रस्ते तसेच अन्य पर्यटन सुविधांचा समावेश व्हावा. कास पठारावरून होणारी अनिर्बंध वाहतूक तत्काळ बंद व्हावी. त्यामुळे अवाजवी रस्तेबांधणी देखील आटोक्यात येईल. कासवरील जमिनीच्या बांधकाम तसेच व्यावसायिक वापरावर निर्बंध असावेत.

पर्यटकांच्या गर्दीला आटोक्यात ठेवण्यासाठी जर कुंपणाची गरज असेलच तर त्याच्या बनावटीचा गांभीर्याने विचार व्हावा. कासच्या पर्यावरणाशी मिसळून बांधता येईल असेच कुंपण घातले जावे. लहानमोठ्या सरपटणाऱ्या अथवा सस्तन प्राण्यांच्या स्थलांतर मार्गांचा, स्थानिक पायावाटांचा विचार करून कुंपणाच्या मर्यादा ठरवण्यात याव्या.

कास पठारावर पर्यटनासाठी खुल्या ठेवण्यात येणाऱ्या भागाची धारणक्षमता लक्षात घेऊनच पर्यटकांना प्रवेश दिला जावा. त्यासाठी काही आकार घेतला जावा. त्या निधीतून दीर्घकालीन नियोजनात वापरानुसार जमिनीची विभागणी, कचऱ्याचे नियोजन, पार्किंग, अंतर्गत वाहतुकीसाठी बसची सुविधा, पर्यटन मार्गदर्शक, विश्रामगृह तसेच एका माहितीकेंद्राची आखणी करण्यात यावी.

*कासच्या सौंदर्याचा खऱ्या अर्थाने आनंद लुटण्यासाठी या परिसंस्थेला समजून घेणे, तिचा आदर करणे आवश्यक आहे. इथे भेट देणाऱ्या प्रत्येकाला हे समजून जबाबदार पर्यटक होता यावे....*

*कासच्या परिसंस्थेला झालेले नुकसान भरून काढण्यासाठी थोडा अवकाश मिळावा तसेच तेथील पर्यटनाचा दबाव कमी व्हावा म्हणून या मोसमात कासला भेटच न देण्याचे आवाहन पर्यावरणप्रेमींना करण्यात आले. निसर्गप्रेमी संस्थांनी देखील यावर्षी कास पठारावर सहली आयोजित न करण्याचे जाहीर केले....*

कार्यक्रमात पुढे मुक्त चर्चेमध्ये काही अन्य महत्त्वाचे मुद्दे समोर आले. कासचे नियोजन एका सशक्त कायदेशीर चौकटीत बसवल्यास शासकीय अधिकाऱ्यांना कासच्या संरक्षणासाठी अधिक परिणामकारकरीत्या काम करणे शक्य होईल.

प्राण्यांच्या नैसर्गिक चलनवलनाचा अभ्यास करूनच स्थलांतर मार्ग मोकळे सोडण्यात यावे.

महितीकेंद्राकडे नेहमीच्या ठाशीव चौकटीतून न पहाता पर्यावरणाशी जुळवून घेणाऱ्या पर्यायी बांधणीचा विचार व्हावा.

संरक्षण धोरणाच्या आरेखनात स्थानिक लोकांचा भरीव सहभाग असावा.

तज्ञ समितीच्या सल्ल्यानेच कासवरील संरक्षणविषयक कामे केली जावीत. या समितीने धोरणे ठरवणे, अमलात आणणे तसेच कासवर काम करणाऱ्या सर्व घटकांमध्ये संवाद घडवून आणणे यावर देखरेख करावी.

किरण पुरंदरे यांनी चर्चेचा समारोप करताना हा लोक-संवाद केवळ सुरुवातच असल्याचे नमूद करत सर्वांना जबाबदार पर्यटक होण्याचे आवाहन केले.